नि दि दावा क्र. ०७/२०१९
अनुसया वि. शासन



**प्रतिवादी क्र ५ तर्फे सा.क्र.३**
**(नि.क्र.१३९)**

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.डी एस साबने वकील यांच्यामार्फत सुरु.</u>**

३. माझे शिक्षण झाले नाही. सहीपुरते मी डंगरी शाळेत दुसरीपर्यंत शिकलो आहे. माझ्याकडे आधार कार्ड आहे. मी जातीने धनगर आहे. आमच्या जातीतील लग्न, दत्तक असे विधी ब्राम्हण करतात. तसेच मराठा, लिंगायत, व इतर समाजातही असे विधी ब्राम्हण करतात. मी घरात हरीपाठ करतो. प्रभाकर रंगराव कुलकर्णी यांच्यासोबत मी जात होतो. प्रभाकरचे वडिल त्या काळात पौरोहित्य करीत. माझ्याकडे पौरोहित्याची डिग्री नाही. १९६५ सालानंतर पुन्हा मी कोणाचेही लग्न लावायला गेलो नाही. १९६४ साली मी कोणाचेही लग्न केले नाही. चेरा येथील बळीराम पिकले याचे लग्न प्रभाकर दिवाणजीने लावले. माझे लग्न १९६२ साली झाले आहे. जनाबाईची सुन लता कोणत्या गावची आहे हे मला माहिती नाही. लता माझ्याच गावातील आहे हे मला माहिती नाही. आमच्या गावात ढोबळे आडनावाचे लोक रहात असावेत. लता ही ढोबळे यांची मुलगी आहे, याबददल मला माहिती नाही. मला दत्ताने साक्ष दयायला सांगितले. दावा कशासाठी केला आहे, कोणी केला आहे, हे मला माहिती नाही.

४ आशा वि गंगाधर या रे दि मु क्र ४२५/२०२१ या दाव्यात माझी साक्ष झाली आहे, हे खरे नाही. त्याकामी शपथपत्रात माझा व्यवसाय शेती असे लिहीलेला आहे, हे खरे नाही. त्या शपथपत्रावरील सही माझी नाही. आता मला माझे या कामातील शपथपत्र दाखवले त्यावर माझी म्हणून असलेली सही कोणी केली हे मला माहिती नाही. हे खरे की मी अंगठा उमटवतो. हे खरे नाही की, लताच्या सांगण्यावरुन मी साक्षीला आलो.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
**स्वाक्षरीत/**
**(एस.एन.सरडे)**

दिनांक २४/०४/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.